## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३८५८ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सचिन उद्धव शिंदे | उप अभियंता,<br>स्थापत्य विभाग, मुख्य कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी | कार्यकारी अभियंता,<br>स्थापत्य विभाग, मुख्य कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी |

### ( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २५.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती देण्यास नकार दिला " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| **माहिती अर्ज दिनांक** | **माहितीचा तपशील** |
|---|---|
| २९.१२.२०१७ | प्रभाग अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह, उद्यान कार्यालय व मुख्यालय यांनी सन २०१० ते डिसेंबर २०१७ पर्यत केलेल्या कामाची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. "

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, " अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. २४.०५.२०२४ रोजी विनामुल्य माहिती देण्याबाबत आदेश पारित केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०६.२०२४ रोजीच्या पत्राने एकूण २३१ पृष्ठे अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करून दिले आहेत. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जात पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या अंतर्गत येणाऱ्या वेगवेगळ्या विभागांची एकूण सात वर्षाची माहिती मागितली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात

माहिती मागवून अपिलार्थी कोणते / कसे जनहित साध्य करणार आहे? याबाबत विचारणा केली असता, ते त्याबाबत स्पष्टीकरण देवू शकले नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अतिविस्तृत व मोघम स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०६.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांना एकूण २३१ पाने माहिती दिली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३८५८ / २०२४ / पुणे 10831/2025 दिनांक - 11/12/2025